**PRESS MONITOR**

Publication : Lokprerna
Edition : Pune
Date : February 23, 2017

# एचएसआयएल तर्फे रंगीबेरंगी हिंदवेअर स्नोक्रेस्ट एअर कूलर्स बाजारात दाखल, ग्राहकोपयोगी उत्पादन विभागाला बळकटी

पुणे : हिंदवेअर या भारतातील सॅनिटरीवेअर बाजारपेठेतील आघाडीच्या ब्रॅण्डचे प्रमोटर एचएसआयएल लिमिटेड तर्फे त्यांच्या एअर कुलर्समधील नव्या उत्पादनांचे अनावरण करण्यात आले. हिंदवेअर स्नोक्रेस्ट या ब्रॅण्डमधील या उत्पादनात एअर कुलर्समधील समोरच्या पॅनलचा रंग बदलता येतो. एअर कुलर्समधील या नव्या उत्पादनांमुळे एचएसआयूएलच्या अष्टपैल आणि व्यापक कन्झ्युमर प्रोडक्ट्स डिव्हिजनला अधिक बळकटी मिळेल. भारतातील ३,६५० कोटींच्या एअर कुलर्सच्या बाजारपेठेत सध्या १० टक्क्यांची घसरण झाली असली तरीही आर्थिक वर्ष १४-१७ या काळात या बाजारपेठेने १६ टक्के सीएजीआर अनुभवला आहे. या बाजारपेठेत संघटित बाजारपेठेचा हिस्सा केवळ एक तृतीयांश आहे. त्यामुळे, एचएसआयएलला त्यांच्या एअर कुलर्समधील उत्पादनांचे अस्तित्व वाढवण्यास साह्य होणार आहे.

डेझर्ट, पर्सनल आणि विंडो या विभागातील हे एअर कुलर्स १८ लि. ते १०० लि. अशा एकुण १४ प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत. रंग बदलता येणाऱ्या पॅनलची सुविधा काही निवडक मॉडेल्समध्ये उपलब्ध आहे. यात सध्या प्रिमिअम पर्पल, ब्रिक रेड आणि आयसी ग्रे हे रंग उपलब्ध आहेत. ३८०० एम/तास या वेगाने हवा बाहेर फेकणाऱ्या या मॉडेलमध्ये कमी ऊर्जा वापरून अद्वितीय थंडावा निर्माण केला जातो. ही ट्रेण्डी रंगीत उत्पादने ८९९० ते १७९९० रु. या किमतीत उपलब्ध आहेत.

या शुभारंभाबद्दल संदिप सोमानी म्हणाले, अप्रतिम डिझाइन्स, कल्पकता आणि अजोड दर्जा हे एचएसआयएलच्या व्यवसाय नितिमत्तेचे मूळ आहे. कन्झ्युमर बिझनेसमध्ये वाढ करणे आणि या विभागात आघाडीच्या स्थानी पोहोचणे या उद्देशासह आम्ही आमच्या ग्राहकांना उत्कृष्ट उत्पादने यापुढेही देत राह. कन्झ्यमर प्रोडक्टस विभागातील उत्पादनांनी आमच्यासाठी बाजारपेठेत एक स्थान निर्माण केले आणि आम्हाला नव्या संभाव्य ग्राहकांपर्यंत पोहोचण्यात साह्य केले आहे. आमची ही कार्यपद्धती अगदी योग्य मार्गावर आहे आणि त्याचे योग्य परिणाम दिसत आहेत, हे पाहून आम्हाला आनंद होत आहे.ठ

ते पुढे म्हणाले, आमच्या ब्रॅण्डमध्ये ग्राहकांना कायम रस वाटावा यासाठी सतत नवनवीन उत्पादने देणे आणि त्यात नवीन प्रकार आणणे यूतन दर्जा वाढवणे, हेच आमचे ध्येय आहे. या वर्षी वॉटर हिटर विभागाला अधिक बळकटी देत वॉटर आणि एअर प्युरिफाय गटात आणि किचन अप्लायन्सेसमध्ये अधिक नवी उत्पादने देण्याचा आमचा विचार आहे. नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पामुळे निर्माण झालेल्या सकारात्मक वातावरण आणि ग्राहकांच्या प्रतिसादामुळे पुढील वर्षभरासाठी आम्हाला सकारात्मक दृष्टिकोन लाभला आहे.

स्मार्ट घडण आणि डिझाइन यामुळे हिंदवेअर स्नोक्रेस्ट एअर कुलर्समध्ये अभिजात सौंदर्य आणि आधुनिकता दिसन येते. यातन या विभागात नवे मानांकन प्रस्थापित करण्याची खात्री हे एअर कुलर्स देतात. या प्रकारचे पहिलेच, दिमाखदार, रंग बदलता येणाऱ्या पॅनलसहितचे हे कुलर्स ग्राहकांना त्यांची वैयक्तिक स्टाइल दाखवण्याची संधी देतातच. त्याचप्रमाणे, हे कुलर्स घराच्या सजावटीमध्येही सहज एकरूप होतात. या एअर कुलर्समध्ये खास अँटी-स्किड टॉप कव्हर आहे. यामळे त्यावर वूस्त ठेवण्यासाठी अतिरिक्त पकड आणि योग्य जागा उपलब्ध होते. शिवाय, यात खोलीत जलद गारवा पसरावा यासाठी खास आइस चेंबर आहे. डेझर्ट, पर्सनल आणि विंडो प्रकारातील या एअर कुलर्समध्ये ४-वे एअर डिफ्लेक्शन, फॅन, वेग आणि टायमयसाठी रिमोटसह डिजिटल डिस्प्ले पॅनल आहे. पर्सनल कुलर मॉडेलमध्ये रिमोट ठेवण्यासाठी एक पॉकेट देण्यात आले आहे.